I/Socialwelfare/ 58/2018
14/08/2018.

महाराष्ट्र शासन

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

**सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसमोर, श्रध्दानंदपेठ, नागपूर-२२
दुरध्वनी / फॅक्स क्र.०७१२-२२२१०४१, ई-मेल-sdswo.nagpur@gmail.com

जाक्र.सआसकअना/स्वाधार/3726/१८-१९/ नागपूर दिनांक : 9/8/2018

प्रति,
प्राचार्य,
KDK College
of engineer नागपूर

**विषय :- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षासाठी अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना लाभ मिळणे करीता कार्यशाळेच्या आयोजनाबाबत**

वरील विषयास अनुसरुन आपणांस कळविण्यात येते की, अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना जिल्हाक्षेत्रात राहून उच्च शिक्षण घेता यावे या करीता त्यांनी सामाजिक न्याय विभागाच्या शासकीय वसतिगृहासाठी अर्ज केलेला आहे परंतू त्यास गुणत्तेमध्ये राखीव जागेअभावी वसतिगृहात प्रवेश मिळू शकलेला नाही. किंवा बाहेर स्वखर्चाने भाडेत्तवावर राण्याची व्यवस्थाकरुन शिक्षण घेत आहेत अशा विद्यार्थ्यांना बाहेर राहून शासकीय वसतिगृहातील निवास, भोजन, शैक्षणिक साहित्य इ. असलेल्या सुविधा स्वतः उपलब्ध करुन घेणे करीता सन २०१६-१७ पासून भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरु करण्यात आलेली आहे.

सदर योजने करीता सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षा करीता विद्यार्थ्यांनी अर्ज करणे संदर्भात जिल्हा क्षेत्रातील महानगरपालिकेच्या हद्दीतील व महानगरपालिका हद्दीपासून ५ कि. मी. अंतरावर असलेल्या महाविद्यालयामध्ये जावून अनु. जातीच्या विद्यार्थ्यांना योजनेचे महत्व पटवून सांगणे, योजनेचा लाभ घेणेबाबत प्रोत्साहन देणे व विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेणे या करीता महाविद्यालयात कार्यशाळा घेणे बाबत जिल्हाकार्यक्षेत्रातील समतादुत श्री/~~श्रीमती~~ अलाफ कुरेशी यांना प्राधिकृत करण्यात आले आहे तरी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या कार्यात महाविद्यालयाचा सहभाग महत्वाचा आहे. त्या अनुषंगाने कार्यशाळेच्या आयोजना संदर्भात संबंधीत समता दुतांना अपेक्षीत सहकार्य करण्यात यावे ही विनंती.

सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण, नागपूर

प्रत : श्री/~~श्रीमती~~ अलाफ कुरेशी

समतादुत, आपणांस कळविण्यात येते की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या संदर्भात जिल्हा क्षेत्रातील महानगरपालिकेच्या हद्दीतील व महानगरपालिका हद्दीपासून ५ कि. मी. अंतरावर असलेल्या महाविद्यालयामध्ये जावून प्राचार्य यांच्या सहकार्याने सन २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाकरीताअनु. जातीच्या विद्यार्थ्यांना योजनेचे महत्व पटवून सांगणे, योजनेचा लाभ घेणेबाबत प्रोत्साहन देणे व विद्यार्थ्यांकडून अर्ज भरुन घेणे या करीता महाविद्यालयात कार्यशाळा घेण्यात यावी. व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.

20/8/2018
Notice
Distribute

सहाय्यक आयुक्त
समाज कल्याण, नागपूर

9022599055
अलाफ कुरेशी